ePaper

"35 वर्षांनंतर काश्मीर 'भारतीय वंशाच्या' दहशतवाद्यांपासून मुक्त", केंद्रीय गृहमंत्री शाह यांची घोषणा!

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 3 वरुन...

नाशिक फाटा-खेड 'एलिव्हेटेड कॉरिडॉर' भूसंपादन पूर्ण!

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 20 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

कपिल सिब्बल यांचा सुप्रीम कोर्टात जोरदार युक्तिवाद

शिवसेना फुट भाजपाकडून पूर्वनियोजित!

महाईन्यूज । नवी दिल्ली


शिवसेनेतील फूट आणि पक्षाच्या नावासह धनुष्यबाण चिन्हावरील हक्काच्या वादाला सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीमुळे पुन्हा महत्त्व प्राप्त झाले आहे. ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी गुरुवारी (१९ नोव्हेंबर) जोरदार युक्तिवाद करत २०२२ मधील शिवसेना फूट ही पूर्वनियोजित होती आणि त्यामागे भाजपची मदत होती, असा दावा केला. तसेच, विधिमंडळातील आमदारांचे संख्याबळ म्हणजे संपूर्ण राजकीय पक्ष नव्हे, असा मुद्दा उपस्थित करत निवडणूक आयोगाच्या निर्णयावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पक्षांतर्गत फूट असल्याचा शिंदे गटाचा दावा असेल, तर हे प्रकरण राज्यपालांकडे कसे गेले, असा सवालही त्यांनी न्यायालयात केला.

निवडणूक आयोगाच्या निर्णयावर आक्षेप

निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरही सिब्बल यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पक्षाच्या संघटनात्मक रचनेचा विचार न करता आयोगाने केवळ विधिमंडळातील सदस्यांची संख्या लक्षात घेऊन निर्णय घेतल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रक्रियेत ठाकरे गटाला आवश्यक ती नोटीस देण्यात आली नसल्याचेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. शिवसेनेच्या पक्षघटनेत पक्षप्रमुख हे पद स्पष्टपणे नमूद असल्याचे सांगत संघटनात्मक रचनेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

'एकनाथ शिंदे म्हणजे संपूर्ण शिवसेना नव्हे'

शिंदे गटाने राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबतच्या आघाडीतून बाहेर पडण्याचा मुद्दा उपस्थित केला होता. मात्र, विचारधारेच्या कारणावरून पक्षफुटीचे समर्थन करता येणार नाही, असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला. एकनाथ शिंदे हे म्हणजे संपूर्ण शिवसेना नसून ते केवळ विधिमंडळ पक्षाचे प्रतिनिधित्व करतात, असे त्यांनी स्पष्ट केले. एकवेळ उद्धव ठाकरे म्हणजे पक्ष नाहीत, असे गृहीत धरले, तर मग उद्धव ठाकरे यांचे पक्षातील स्थान काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.



सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. यावेळी सिब्बल यांनी शिवसेनेतील बंडाच्या घटनाक्रमाकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. विधान परिषदेच्या निवडणुकीपूर्वीच पक्षातील फूट घडवून आणण्याची तयारी सुरू होती. या संपूर्ण घडामोडींमध्ये भाजपची मदत होती, असा दावा त्यांनी केला.

२२ जून २०२२ रोजी झालेल्या बैठकीचा संदर्भ देताना सिब्बल यांनी तत्कालीन मुख्य प्रतोद सुनील प्रभू यांनी काढलेल्या पत्राचा उल्लेख केला. या बैठकीची माहिती संबंधित आमदारांना देण्यात आली होती. त्यानंतर घडलेल्या घटनांवरून बंडाची तयारी आधीपासूनच सुरू होती, असे त्यांनी मांडले. पक्षांतर्गत मतभेदांचा विषय असेल, तर त्यामध्ये राज्यपालांची भूमिका कशी आली, असा प्रश्न उपस्थित करत या प्रकरणातील घटनात्मक प्रक्रियेवर त्यांनी आक्षेप घेतला.

शिवसेनेच्या पक्षघटनेत पक्षप्रमुख हे पद स्पष्टपणे नमूद आहे.

त्यामुळे पक्षाची ओळख निश्चित करताना केवळ आमदारांचे संख्याबळ निर्णायक ठरू शकत नाही. पक्षाची संघटनात्मक रचना आणि विधिमंडळातील गट या दोन स्वतंत्र बाबी असल्याचे सिब्बल यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, शिंदे गटाकडून भरत गोगावले यांची प्रतोद म्हणून निवड आणि सुनील प्रभू यांना पदावरून दूर करण्याच्या प्रक्रियेवरही सिब्बल यांनी प्रश्न उपस्थित केले. गुवाहाटीत बसून एकनाथ शिंदे प्रतोद कोण असेल, हे ठरवू शकत नाहीत, असा युक्तिवाद त्यांनी केला. पक्षाचा प्रतोद आणि विधिमंडळ पक्षाचा नेता निवडण्याचा अधिकार कोणाला आहे, याबाबत घटनात्मक तरतुदींचा विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

सिब्बल यांनी पुढे इशारा दिला की, विधिमंडळातील बहुमताच्या आधारे एखाद्या बंडखोर गटाला मूळ राजकीय पक्षाचा दर्जा दिला, तर देशातील निवडून आलेल्या सरकारांच्या स्थैर्यालाच धोका निर्माण होऊ शकतो. बहुसंख्य आमदारांनी वेगळा गट स्थापन केला म्हणून त्यांना संपूर्ण पक्षाची ओळख आणि निवडणूक चिन्ह मिळू शकत नाही, ही ठाकरे गटाची प्रमुख भूमिका आहे.

दरम्यान, गुरुवारची सुनावणी पूर्ण झाली असून पुढील सुनावणी २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालय कोणती भूमिका घेते, यावर शिवसेनेच्या दोन्ही गटांचे राजकीय भवितव्य आणि पक्षाच्या अधिकृत ओळखीचा प्रश्न अवलंबून आहे. त्यामुळे आगामी सुनावणीकडे महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

अतिक्रमणावर रोज JCB धडाडणार

कारवाई थांबवण्यासाठी फोन करणाऱ्यांची नावं जाहीर करणार; आयुक्तांचा थेट इशारा

महाईन्यूज । पुणे

पुणे शहरातील अतिक्रमणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, महापालिका प्रशासनाने अतिक्रमणविरोधी कारवाई अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. फर्ग्युसन कॉलेज (FC) रस्त्यावरील अतिक्रमणाच्या मुद्द्यावर भाजप नगरसेवकांनी आंदोलन केल्यानंतर महापालिका प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले आहे. फर्ग्युसन रस्ता, जंगली महाराज रस्ता (JM रोड) यांसह शहरातील विविध भागांत अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. आता ही मोहीम डिसेंबर महिन्यातही सुरूच राहणार असल्याचा स्पष्ट इशारा पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी दिला आहे.



डिसेंबरपर्यंत संपूर्ण पुणे शहरात महापालिकेचे जेसीबी दिसतील आणि या कारवाईत एकही दिवस खंड पडणार नाही, असा निर्धार आयुक्तांनी व्यक्त केला आहे. अतिक्रमण कोणाचेही असले, तरी ते हटवले जाईल. कारवाई थांबवण्यासाठी कोणाचाही हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही, अशी कठोर भूमिका त्यांनी घेतली आहे.

पुणे शहरातील अतिक्रमणविरोधी कारवाई केवळ काही प्रमुख रस्त्यांपुरती मर्यादित न ठेवता संपूर्ण शहरात राबवण्यात येणार आहे. शहरातील जवळपास प्रत्येक रस्त्यावर अतिक्रमणाची समस्या असल्याचे आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले. त्यामुळे महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाकडून सातत्याने कारवाई केली जाणार आहे.या मोहिमेत एकही दिवस खंड पडणार नसल्याचे सांगत, प्रशासनाने अतिक्रमण हटवण्याचा ठाम निर्धार केला आहे. पुढील दोन महिन्यांत संपूर्ण अतिक्रमण हटवता येईल की नाही, याबाबत निश्चित सांगता येणार नसले, तरी कारवाई दररोज सुरू राहील, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

आयुक्त म्हणाले, पुण्यात जवळपास अडीच लाख दुकाने फ्रंट मार्जिनच्या जागेवर थाटण्यात आली आहेत. फुटपाथवरील दुकानांवर कारवाई केल्यानंतर काही काळ परिस्थिती सुधारते; मात्र ही कारवाई अनेकदा तात्पुरती ठरते. त्यामुळे आता केवळ फुटपाथवरील अतिक्रमण हटवून चालणार नाही, तर फ्रंट मार्जिनवरील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवरही लक्ष केंद्रित केले जाणार आहे. फ्रंट मार्जिनच्या जागेवर एक इंचही अनधिकृत बांधकाम सहन केले जाणार नाही, असा ठाम इशारा आयुक्तांनी दिला आहे.

अतिक्रमणविरोधी कारवाईदरम्यान अनेकदा राजकीय दबाव किंवा फोनद्वारे कारवाई थांबवण्याचे प्रयत्न होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर आयुक्त नवल किशोर राम यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. अतिक्रमण कोणाचेही असो, ते हटवले जाईल. कारवाईदरम्यान कोणाचाही हस्तक्षेप सहन केला जाणार नाही.

FC रोड आणि JM रोड कारवाई

फर्ग्युसन रस्त्यावरील अतिक्रमणाचा मुद्दा भाजप नगरसेवकांनी आंदोलनाच्या माध्यमातून उपस्थित केला होता. त्यानंतर महापालिका प्रशासनाने FC रोड आणि JM रोडसह विविध भागांत कारवाई सुरू केली. मात्र, आता ही मोहीम केवळ काही दिवसांची किंवा ठरावीक रस्त्यांपुरती राहणार नसल्याचे आयुक्तांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होत आहे. फुटपाथवरील अतिक्रमण, दुकानांसमोरील अनधिकृत बांधकामे आणि फ्रंट मार्जिनवरील कब्जा हटवण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे. त्यामुळे शहरातील व्यापारी, दुकानदार आणि अतिक्रमण करून व्यवसाय करणाऱ्यांना या कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

भिडे पूल वाहतुकीसाठी बंद; पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे पोलिसांचे आवाहन

महाईन्यूज । पुणे

पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी आहे. मुठा नदीवरील भिडे पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानक आणि मध्यवर्ती पेठ परिसराला जोडणारा नवीन पादचारी पूल उभारण्याचे काम सुरू असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. या कामामुळे भिडे पुलावरील वाहतूक बंद राहणार असून, वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पुणे शहर वाहतूक पोलिसांनी केले आहे.



डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानक आणि मध्यवर्ती पेठ परिसर यांच्यातील संपर्क अधिक सुलभ करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या भिडे पुलाच्या वर नवीन पादचारी पूल उभारण्यात येत आहे. या पुलामुळे नारायण पेठ, शनिवार पेठ आणि लक्ष्मी रस्ता परिसरातील नागरिकांना मेट्रो स्थानकापर्यंत पोहोचणे अधिक सोयीचे होणार आहे. तसेच या भागात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांनाही याचा फायदा होणार आहे.

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे जनसंपर्क अधिकारी चंद्रशेखर तांबेकर यांनी नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आणि बांधकामाच्या कालावधीत मेट्रो प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे भिडे पूल परिसरातून नियमित प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी प्रवासाचे नियोजन आधीच करावे आणि वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे.

भिडे पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याने वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागणार आहे. भिडे पुलावरून डेक्कनच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांनी टिळक चौक आणि खंडोजी बाबा चौक या मार्गाचा अवलंब करावा. तसेच नदीपात्रातून जयंतराव टिळक पूल आणि गद्रे हॉटेल चौक मार्गेही डेक्कनकडे जाता येणार आहे. केळकर रस्त्यावरून ओंकारेश्वर पूल आणि शास्त्रीराणी चौक हा देखील पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे. दरम्यान, डेक्कन पीएमटी बसस्थानकाकडून केळकर रस्ता आणि नारायण पेठेकडे जाणारी वाहतूक टिळक चौक व खंडोजी बाबा चौकातून वळवण्यात येणार आहे. तर टिळक चौकाच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांना शास्त्री रस्ता आणि एस. एम. जोशी पुलाचा वापर करता येणार आहे.

३१ डिसेंबरपर्यंत वाहतूक बंद

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माहितीनुसार, गुरुवार (दि. १९ नोव्हेंबर) सकाळी ६ वाजल्यापासून ३१ डिसेंबरपर्यंत भिडे पूल वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. मात्र, वाहतूक पोलिसांच्या सूचनेनुसार १७ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजल्यापासूनच या पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली असून, पुढील आदेश मिळेपर्यंत ही बंदी लागू राहणार आहे. दरम्यान, नदीपात्रातून जाणारा रस्ता वाहतुकीसाठी खुला ठेवण्यात येणार आहे.

नाशिक फाटा-खेड आठपदरी 'एलिव्हेटेड कॉरिडॉर' भूसंपादन पूर्ण!

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यानंतर एनएचएआयचा अहवाल

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पुणे–नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड (राजगुरुनगर) या आठपदरी उन्नत मार्गासाठी आवश्यक संपूर्ण जमिनीचा कागदोपत्री ताबा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) मिळाला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रस्तरावर प्रकल्पाला चालना मिळाली, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने भूसंपादन आणि आर्थिक बाबींमध्ये सहकार्य केले. भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी मागविलेल्या अहवालात एनएचएआयने निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्याचे आणि २८ ऑक्टोबर २०२६ रोजी 'लेटर ऑफ अवॉर्ड' जारी केल्याचे स्पष्ट केले आहे.

भोसरी–चाकण औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक कोंडी, कामगारांची दैनंदिन ये-जा आणि मालवाहतुकीतील अडचणी लक्षात घेऊन आमदार लांडगे यांनी १४ ऑक्टोबर रोजी एनएचएआयला पत्र दिले होते. भूसंपादन, निविदा, राज्य शासनाचे आर्थिक सहकार्य आणि पुढील कामांचे वेळापत्रक याबाबत त्यांनी सविस्तर माहिती मागविली होती. त्या अनुषंगाने एनएचएआयच्या पुणे प्रकल्प कार्यालयाने ४ नोव्हेंबर रोजी मुद्देनिहाय अहवाल तयार केला.

एनएचएआयच्या अहवालानुसार, प्रकल्पासाठी यापूर्वी ९३ टक्के जमीन उपलब्ध होती. प्रवेश आणि निर्गमन रॅम्पसाठी आवश्यक उर्वरित १०.६९ हेक्टर जमिनीच्या संपादनाला पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून गती देण्यात आली. पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक संपूर्ण जमिनीचा कागदोपत्री ताबा एनएचएआयकडे सुपूर्द केला आहे. राज्य जीएसटीची प्रतिपूर्ती आणि रॉयल्टीतील सवलतींना राज्य शासनाने मंजुरी दिल्याचेही अहवालात नमूद आहे.



'व्हीजन-२०२०'मधील प्रकल्प आता बांधकामाच्या उंबरठ्यावर

आमदार लांडगे यांच्या 'व्हीजन-२०२०'मधील हा सुमारे २९.९२ किलोमीटरचा आठपदरी उन्नत मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० वर उभारला जाणार आहे. नऊ प्रमुख जंक्शन, दोन मोठे पूल, दोन्ही बाजूंना सेवा रस्ते आणि प्रवेश-निर्गमनासाठी रॅम्प यांचा प्रकल्पात समावेश आहे. या मार्गामुळे भोसरी–चाकण औद्योगिक पट्ट्यातील वाहतुकीचा ताण कमी होण्याची अपेक्षा आहे. बांधकामपूर्व मंजुऱ्या आणि भूसंपादनासाठीची संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून, एनएचएआयने 'अपॉइंटेड डेट' अर्थात काम सुरू करण्याची अधिकृत तारीख जाहीर केल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होईल. त्या तारखेपासून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ३६ महिन्यांची मुदत निश्चित करण्यात आली आहे.

"भोसरी–चाकण औद्योगिक पट्ट्यात रोज ये-जा करणाऱ्या कामगारांचा आणि प्रवाशांचा वाहतूक कोंडीत जाणारा वेळ वाचावा, यासाठी नाशिक फाटा–खेड आठपदरी उन्नत मार्गाचा आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने या प्रकल्पाला आर्थिक सहकार्य दिले. 'व्हीजन-२०२०'मधील या प्रकल्पासाठी आवश्यक संपूर्ण जमिनीचा कागदोपत्री ताबा एनएचएआयला मिळाला असून कंत्राट मंजुरीचे पत्रही जारी झाले आहे. आता काम सुरू करण्याची अधिकृत तारीख लवकर जाहीर व्हावी आणि त्या तारखेपासून ३६ महिन्यांच्या निर्धारित मुदतीत प्रकल्प पूर्ण व्हावा, यासाठी आमचा पाठपुरावा सुरू राहील."

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

'टॉवर हिल'च्या उड्डाणांना हिरवा कंदील; वीजवाहिनीचा मार्ग बदलणार!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

मावळ तालुक्यातील कामशेतच्या 'टॉवर हिल'वरील पॅराग्लायडिंगला दिलासा मिळाला आहे. मुख्य उड्डाण क्षेत्रातून जाणाऱ्या प्रस्तावित वीजवाहिनीचा मार्ग बदलण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी गुरुवारी झालेल्या बैठकीत दिल्याची माहिती खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली. वीजवाहिनीच्या कामामुळे पॅराग्लायडिंगला कोणत्याही परिस्थितीत अडथळा येऊ नये, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याचे बारणे यांनी सांगितले.

प्रस्तावित वीजवाहिनीच्या तीन खांबांमुळे 'टॉवर हिल'च्या मुख्य उड्डाण क्षेत्रात अडथळा निर्माण होण्याची शक्यता होती. कामशेत पॅराग्लायडिंग असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार बारणे यांची भेट घेऊन वीजवाहिनीचा मार्ग बदलण्याची मागणी केली होती. त्यानंतर बारणे यांनी केंद्रीय विद्युत मंत्रालयाचे सचिव पंकज अग्रवाल यांच्याकडे हा प्रश्न मांडला. तीन खांबांसाठी गेल्या ३० वर्षांपासून सुरू असलेला साहसी क्रीडा प्रकार बंद पडू नये, यासाठी खांब उड्डाण क्षेत्राबाहेर उभारण्याचा पर्याय त्यांनी सुचविला होता. त्यावर संबंधित कंपनीशी चर्चा करून फेरसर्वेक्षण करण्याचे आणि खांब बाजूने नेण्याचे निर्देश अग्रवाल यांनी दिले होते.

जिल्हाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीला कामशेत पॅराग्लायडिंग असोसिएशनचे अध्यक्ष संजय एम. राव, उपाध्यक्ष विनोद शेलार आणि वीजवाहिनीचे काम करणाऱ्या अदानी पॉवरचे अधिकारी उपस्थित होते.



उड्डाण प्रशिक्षणासह स्थानिक व्यवसायांनाही दिलासा

'टॉवर हिल'वर दरवर्षी हजारो देशी-विदेशी पर्यटक आणि शेकडो प्रशिक्षणार्थी वैमानिक येतात. सप्टेंबर ते मार्च या पूर्वेकडील वाऱ्यांच्या हंगामात उड्डाणांसाठी या ठिकाणाला व्यवहार्य पर्याय उपलब्ध नसल्याचे बारणे यांनी सांगितले. पॅराग्लायडिंगसाठी येणाऱ्या पर्यटकांवर स्थानिक वाहतूक सेवा, होमस्टे, कॅफे आणि उपाहारगृहांचा व्यवसायही अवलंबून आहे. त्यामुळे वीजवाहिनीचा मार्ग बदलण्याच्या निर्णयाने वैमानिक आणि प्रशिक्षण संस्थांसह स्थानिक व्यावसायिकांनाही दिलासा मिळणार आहे.

३० वर्षांची परंपरा कायम!

गेल्या ३० वर्षांपासून कामशेतमध्ये सुरू असलेला पॅराग्लायडिंगचा साहसी क्रीडा प्रकार आता सुरक्षितपणे सुरू राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'टॉवर हिल'वरील प्रस्तावित वीजखांबांमुळे मुख्य उड्डाण क्षेत्रात अडथळा निर्माण होण्याची शक्यता होती. मात्र, खासदार श्रीरंग बारणे यांच्या पाठपुराव्यामुळे वीजवाहिनीचा मार्ग बदलण्याचे आदेश देण्यात आले. त्यामुळे वैमानिक, प्रशिक्षणार्थी आणि साहसी पर्यटकांसह स्थानिक पर्यटन व्यावसायिकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

भूमिका

ॲमेझॉनचा आक्रोश; पृथ्वीच्या विनाशाची नांदी?

जागतिक तापमानवाढ आणि हवामानबदलाचे संकट आता केवळ भविष्यातील धोका राहिलेले नाही, तर त्याचे गंभीर परिणाम जगभर दिसू लागले आहेत. एल निनो किंवा सुपर एल निनोमुळे भारतासह अनेक देशांना दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. मात्र, या संकटाकडे केवळ एका वर्षातील नैसर्गिक बदल म्हणून पाहणे चुकीचे ठरेल.



कारण त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण पृथ्वीच्या पर्यावरणावर होण्याची शक्यता आहे. विशेषतः जगाचे फुप्फुस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ॲमेझॉनच्या जंगलांवर आलेले संकट मानवजातीसाठी धोक्याची घंटा आहे.

ॲमेझॉनचे खोरे ही केवळ नदी आणि जंगलांची परिसंस्था नाही, तर जागतिक जलचक्र, पर्जन्यमान आणि जैवविविधतेचा महत्त्वाचा आधार आहे. पृथ्वीवरील प्रचंड गोड्या पाण्याचा साठा, असंख्य जीवजंतूंचे अस्तित्व आणि वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेण्याची क्षमता यामुळे या जंगलांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मात्र, बेसुमार वृक्षतोड, मानवी हस्तक्षेप आणि वाढत्या तापमानामुळे ही परिसंस्था आधीच कमकुवत झाली आहे. त्यात सुपर एल निनोमुळे निर्माण झालेल्या दुष्काळाने संकट अधिक गडद केले आहे.

ॲमेझॉनमधील नद्यांची पाणीपातळी घसरत असून, जंगलांमध्ये वणव्यांचे प्रमाण वाढत आहे. लाखो हेक्टर जंगल आगीच्या भक्ष्यस्थानी पडणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. या आगींमुळे केवळ झाडे आणि वन्यजीव नष्ट होत नाहीत, तर वातावरणातील प्रदूषणही वाढते. जंगलांचे पुनरुज्जीवन होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. शिवाय, एकदा जंगल जळाल्यानंतर तेथील जमीन अधिक कोरडी आणि ज्वलनशील बनते. त्यामुळे भविष्यात आगींचे चक्र अधिक तीव्र होण्याची भीती आहे.

ॲमेझॉनची जंगले कार्बन डायऑक्साइड शोषून घेऊन जागतिक तापमानवाढीचा वेग कमी करण्यास मदत करतात. तसेच, बाष्पीभवनातून ढगांची निर्मिती आणि पावसाची प्रक्रिया घडवून आणतात. ही नैसर्गिक यंत्रणाच कोलमडली, तर त्याचे परिणाम एका देशापुरते मर्यादित राहणार नाहीत. दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर आणि जैवविविधतेचा ऱ्हास अशा संकटांची तीव्रता वाढू शकते. सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे ॲमेझॉनचे वर्षावन गवताळ प्रदेशात रूपांतरित झाले, तर पुन्हा पूर्वीसारखी जंगलसंपदा निर्माण करणे अशक्य होऊ शकते. पर्यावरणशास्त्रात याला 'टिपिंग पॉइंट' म्हटले जाते.

या संकटातून बाहेर पडण्यासाठी केवळ नैसर्गिक बदलांची चर्चा करून चालणार नाही. जंगलतोड रोखणे, वनसंवर्धनाला प्राधान्य देणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. ॲमेझॉन हजारो किलोमीटर दूर असले, तरी तेथील पर्यावरणीय घडामोडींचे पडसाद भारतासह संपूर्ण जगावर उमटू शकतात. त्यामुळे ही केवळ ब्राझील किंवा दक्षिण अमेरिकेची समस्या नाही. पृथ्वीच्या अस्तित्वाशी जोडलेला हा प्रश्न आहे. निसर्गाचा इशारा वेळीच ओळखला नाही, तर उद्याची पिढी त्याची मोठी किंमत मोजेल. विकासाच्या हव्यासापोटी निसर्गाचा विनाश सुरूच ठेवला, तर मानवाने स्वतःच आपल्या अस्तित्वाचा पाया कमकुवत केल्यासारखे होईल.

प्रासंगिक »

कर्तृत्वाचा विजय

एका गावात दोन कुंभार राहत होते. दोघांचाही माठ बनवण्याचा व्यवसाय होता. पहिल्या कुंभाराला गावातील एका श्रीमंत व्यापाऱ्याची मदत मिळत असे. तो त्याला माती, चाक आणि इतर साहित्य मोफत पुरवत असे.

त्यामुळे त्याचा व्यवसाय चांगला चालत होता. दुसरा कुंभार मात्र स्वतःच्या मेहनतीने व्यवसाय करत होता. तो नवनवीन पद्धती शिकत असे आणि माठांचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करत असे.

काही वर्षांनी व्यापाऱ्याने पहिल्या कुंभाराला मदत करणे बंद केले. अचानक साहित्य मिळणे बंद झाल्याने त्याचा व्यवसाय ठप्प झाला. दुसरीकडे, दुसऱ्या कुंभाराने स्वतःच्या कौशल्याच्या जोरावर व्यवसाय वाढवला होता. त्याने स्वतःचे ग्राहक निर्माण केले आणि गावाबाहेरही माठ विकण्यास सुरुवात केली.

पहिल्या कुंभाराने त्याला विचारले, "तुला कोणाची मदत नसताना एवढी प्रगती कशी साधलीस?" दुसरा कुंभार हसून म्हणाला, "मदत मिळणे चांगलेच; पण त्या मदतीवर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतः सक्षम होणे अधिक महत्त्वाचे आहे."

- तात्पर्य : **खरे यश स्वावलंबन आणि स्वकर्तृत्वात असते.**

देशाच्या अर्थव्यवस्थेची खरी ताकद ही नैसर्गिक आणि टिकाऊ विकासात असते. सरकारी अनुदाने, करसवलती आणि आर्थिक प्रोत्साहनांच्या माध्यमातून उद्योगांना काही काळ गती देता येते.

अनुदानाचा गाजावाजा; उद्योगांच्या विकासाला मात्र मर्यादा!



; मात्र त्यातून दीर्घकालीन औद्योगिक विकास साधला जातोच असे नाही. केंद्र सरकारच्या उत्पादनाधारित प्रोत्साहन (पीएलआय) योजनेच्या प्रगतीचा नीती आयोगाने केलेला आढावा याचीच जाणीव करून देणारा आहे. मोठा गाजावाजा करून सुरू करण्यात आलेल्या या योजनेची प्रत्यक्ष कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे समोर आले आहे.

२०२० मध्ये सुरू झालेल्या या योजनेचा विस्तार आज १४ क्षेत्रांपर्यंत झाला आहे. उद्योगांमध्ये गुंतवणूक वाढवणे, उत्पादनाला चालना देणे आणि रोजगारनिर्मिती करणे हा त्यामागील प्रमुख उद्देश होता. मात्र, मार्च २०२६ अखेर अपेक्षित गुंतवणुकीच्या तुलनेत केवळ ७६ टक्के गुंतवणूक झाली, तर उत्पादनाचे उद्दिष्टही पूर्ण झालेले नाही. सर्वाधिक चिंतेची बाब म्हणजे ३० लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात केवळ ८.४९ लाख रोजगार निर्माण झाले. यावरून सरकारी योजनांची उद्दिष्टे ठरवताना वास्तवापेक्षा अपेक्षांना अधिक महत्त्व दिले जात असल्याचे स्पष्ट होते.

योजनेतील आणखी एक मोठी त्रुटी म्हणजे देशाला अपेक्षित असलेले तंत्रज्ञान आणि कौशल्य आत्मसात करण्यात आलेले अपयश. मोबाइल उत्पादनाच्या क्षेत्रात भारताने मोठी प्रगती केल्याचा दावा केला जात असला, तरी अनेक महत्त्वाचे सुटे भाग परदेशातून आयात करावे लागत आहेत. म्हणजेच उत्पादनांची जुळणी भारतात होत असली, तरी त्यामागील अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आपले प्रभुत्व निर्माण झालेले नाही. दुसरीकडे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांपेक्षा मोठ्या कंपन्यांनाच या योजनेचा अधिक लाभ मिळाला. त्यामुळे सर्वसमावेशक औद्योगिक विकासाचे उद्दिष्टही मागे पडले. सरकारी अनुदान म्हणजे उद्योगांच्या विकासाची हमी नव्हे. उद्योगांना टिकून राहण्यासाठी देशांतर्गत मागणी, संशोधन, तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि सक्षम बाजारपेठ आवश्यक असते. केवळ उत्पादन वाढवून चालणार नाही, तर त्या उत्पादनांना बाजारपेठही मिळाली पाहिजे. अन्यथा सरकारी पैशातून उभे राहिलेले उद्योग जागतिक कंपन्यांच्या पुरवठा साखळीतील केवळ जुळणी केंद्र बनून राहतील.

नीती आयोगाच्या अहवालाकडे केवळ त्रुटी दाखवणारा दस्तऐवज म्हणून न पाहता धोरणात्मक बदलाची संधी म्हणून पाहिले पाहिजे. अनुदानांचे वाटप, रोजगारनिर्मिती, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि लघुउद्योगांचा सहभाग यांचा नव्याने विचार करणे गरजेचे आहे. भारताला केवळ उत्पादन करणारा देश नव्हे, तर संशोधन आणि तंत्रज्ञाननिर्मितीत आघाडी घेणारा देश बनवायचे असेल, तर अनुदानांपेक्षा उद्योगांची स्वयंपूर्णता महत्त्वाची ठरली पाहिजे. अन्यथा सरकारी मदतीच्या कुबड्यांवर उभी राहिलेली औद्योगिक प्रगती दीर्घकाळ टिकणार नाही.

।। अभंगवाणी ।।



अझुनि कां थीर पोरा न म्हणसी किर ।
धरुनियां धीर लाजे बुर निघाला ॥१॥

मोकळा होतासि कां रे पडिलासि डाई ।
वरिलांचा भार आतां उतरेसा नाहीं ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

भूजल आटले, संत्र्याच्या बागा उद्ध्वस्त

कमी पाऊस आणि भूजल पातळीत झालेली घट यामुळे विदर्भातील शेतकरी संकटात

महाईन्यूज । नागपूर

कमी पाऊस आणि भूजल पातळीत झालेली मोठी घट यामुळे विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत. विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडल्याने बागा जगविण्यासाठी पाणीच उपलब्ध नाही. परिणामी, संत्रा उत्पादकांना पक्व होण्यापूर्वीच मृग बहाराची संत्री झाडावरून तोडून फेकावी लागत आहेत. हा बहार हातचा गेल्याने विदर्भातील शेतकऱ्यांचे दरवर्षी सरासरी ८,१४० कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे.



महाराष्ट्रात सुमारे १ लाख ५० हजार हेक्टर क्षेत्रावर संत्रा, ९० हजार हेक्टरवर मोसंबी आणि ३३ हजार हेक्टरवर लिंबाच्या बागा आहेत. राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केलेल्या ३०५ तालुक्यांमधील अनेक भागांत या फळबागांचे क्षेत्र आहे. या बागांवर दुष्काळाचे सावट आहे. संत्रा बागेतून प्रतिहेक्टरी दरवर्षी सरासरी सहा लाख रुपयांचे उत्पन्न मिळते.

यंदा कमी पावसामुळे संत्रा आणि मोसंबी पट्ट्यातील भूजल पातळी कमालीची खालावली आहे. विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडल्या आहेत. त्यामुळे धरणे आणि तलावांमधील पाणी फळबागांसाठी उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. सरकारने याला बगल देत बोअरवेल्स खोदण्यास मुदतवाढ दिली. दुसरीकडे, बोअरवेल्स मशीन मालकांनी त्यांचे दर प्रति फूट १२५ रुपयांवरून ३०० रुपये केले आहेत. त्यामुळे बागा जगविण्यासाठी पाणी आणि पैसे आणायचे कुठून, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.

संत्रा, मोसंबी आणि लिंबाच्या बागा लागवडीनंतर साधारण सहा वर्षांनी उत्पादनक्षम होतात. त्यामुळे एकदा बाग वाळली की नव्याने लागवड करून उत्पन्न सुरू होण्यासाठी शेतकऱ्यांना पुन्हा अनेक वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे. प्रभावी सरकारी उपाययोजना न झाल्यास बागायतदार किमान आठ वर्षे मागे जाण्याची भीती व्यक्त होत आहे. मोसंबीचे प्रती हेक्टरी सरासरी पाच लाख रुपयांचे उत्पन्न होते. पाण्याअभावी राज्यातील ८० लाख हेक्टरवरील मोसंबी बागा वाळल्यास मोसंबी उत्पादकांचे वर्षाकाठी सरासरी चार हजार कोटी रुपयांचे नुकसान होईल. लिंबाचे प्रति हेक्टरी सरासरी सात लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. या बागा वाळल्यास लिंबू उत्पादकांचे वार्षिक सरासरी २,१०० कोटी रुपयांचे नुकसान होईल.

संत्रा उत्पादक जिल्ह्यात बेहाल

अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यात जरुड, मांगरुळी, वावरुडी, लोणी, टेंभूरखेडा, गव्हाणकुंड, बाहदा, इसंब्री, बेनोडा (शहीद), पडसोना आणि मांगोना, मोर्शी तालुक्यातील सालबर्डी, पाडा, डोंगरयावली, घोडदेव आणि हिवरखेड या गावांसह चांदूरबाजार आणि अचलपूर, तसेच नागपूर जिल्ह्यातील नरखेड व वर्धा जिल्ह्यातील कारंजा (घाडगे) तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी पाण्याअभावी त्यांच्या बागांमधील मृग बहाराची संत्री पक्व होण्यापूर्वीच तोडून फेकली आहेत. मोसंबीचे प्रती हेक्टरी सरासरी पाच लाख रुपयांचे उत्पन्न होते.

टीसीएस प्रकरणात इम्तियाज जलील यांना जामीन; देशात धर्मांतराचा अपप्रचार केला जातोय

महाईन्यूज । नाशिक

नाशिकमधील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचा कथित लैंगिक छळ आणि धर्मांतर प्रकरणात एमआयएमचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांना मोठा दिलासा मिळाला आहे. निदा खान या प्रकरणातील प्रमुख आरोपीला फरार असताना मदत केल्याचा आरोप जलील यांच्यावर आहे. या प्रकरणी गुरुवारी नाशिक जिल्हा न्यायालयाने त्यांना ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर नियमित जामीन मंजूर केला.



नाशिक पोलिसांच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) ६ नोव्हेंबर रोजी अतिरिक्त सत्र न्यायालयात जलील यांच्याविरोधात पुरवणी आरोपपत्र दाखल केले होते. निदा खान फरार असताना तिला मदत केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांनाही यापूर्वी अटक करण्यात आली होती. त्यांनी निदा खानला छत्रपती संभाजीनगरमध्ये राहण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्याचा पोलिसांचा आरोप आहे.

निदा खान फरार असताना तिला आश्रय देण्यात आल्याप्रकरणी एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांना यापूर्वी अटक झाली होती. त्यांच्या चौकशीदरम्यान इम्तियाज जलील यांच्याशी संबंधित काही बाबी तपास यंत्रणेच्या निदर्शनास आल्याचा दावा करण्यात आला आहे. जलील आणि पटेल यांच्यात दूरध्वनीवरून संभाषण झाल्याचेही तपासात आढळल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. याच तपासाच्या आधारे जलील यांना नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी पोलिसांसमोर हजेरी लावून चौकशीला सामोरे गेले होते.

नाशिकमधील टीसीएस कंपनीच्या कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांचा कथित लैंगिक छळ, मानसिक त्रास, धर्मांतरासाठी दबाव आणि धार्मिक भावना दुखावल्याच्या आरोपांमुळे हे प्रकरण चर्चेत आले होते. या प्रकरणात पोलिसांनी एकूण नऊ गुन्हे दाखल केले आहेत. त्यापैकी आठ गुन्हे मुंबई नाका पोलीस ठाण्यात, तर एक गुन्हा देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल आहे.

या प्रकरणात आठ महिला पीडितांनी तक्रारी दाखल केल्या आहेत. जुलै २०२२ पासून संबंधित कार्यालयात अशा घटना घडत असल्याचा पोलिसांचा दावा आहे. निदा खानने एका पीडित महिलेचे कथित ब्रेनवॉश करण्याचा प्रयत्न केला तसेच तिला बुरखा आणि धार्मिक साहित्य दिल्याचा आरोप तपासात करण्यात आला आहे. या प्रकरणातील पहिला गुन्हा २६ मार्च रोजी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल झाला होता. निदा खानचा अटकपूर्व जामीन अर्ज २ मे रोजी न्यायालयाने फेटाळला. त्यानंतर ७ मे रोजी छत्रपती संभाजीनगरमधील नारेगाव परिसरातून तिला अटक करण्यात आली होती.

सरकारी वकिलांचा जामिनाला विरोध

जलील गुरुवारी न्यायालयात हजर झाले. यावेळी सरकारी वकील विजय गायकवाड यांनी त्यांच्या जामीन अर्जाला विरोध केला. सहआरोपी मतीन पटेल यांच्याप्रमाणे जलील हेही प्रभावशाली व्यक्ती असल्याने जामीन मिळाल्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेला उपस्थित राहण्यास टाळाटाळ करू शकतात, असा युक्तिवाद सरकारी पक्षाकडून करण्यात आला. मात्र, जलील यांना यापूर्वीच भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या (बीएनएसएस) कलम ३५(३) अंतर्गत पोलिसांनी हजर राहण्याची नोटीस बजावली होती. या बाबीचा विचार करून न्यायालयाने त्यांना ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर नियमित जामीन मंजूर केला.

इंडिया आघाडीविरोधात माझी तक्रार आहे

जामिनावर तुरुंगातून बाहेर आल्यानंतर सपा नेते आझम खान यांची प्रतिक्रिया

महाईन्यूज । नवी दिल्ली

अंतरिम जामिनावर तुरुंगातून सुटल्यानंतर समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते आझम खान यांनी 'इंडिया आघाडी'ला घरचा आहेर दिला आहे. रामपूरमधील निवडणूक गैरव्यवहाराची दखल इंडिया ब्लॉकने वेळीच घेतली असती, तर संभल, कुंदरकी आणि हरयाणातील निवडणुकांचे चित्र वेगळे राहिले असते, असे त्यांनी म्हटले आहे. यासोबतच, निवडणूक आयोगावर टीका करताना घटनात्मक संस्थांनी आपली प्रतिष्ठा कायम राखली पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



रामपूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना आझम खान यांनी निवडणूक आयोग आणि इंडिया आघाडीवर गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, "सर्व घटनात्मक संस्थांनी आपली प्रतिष्ठा जपावी, असे मी कालच सुचवले होते. मात्र, निवडणूक आयोगाच्या भूमिकेमुळे येथील निवडणुका निष्पक्ष होत नसून त्यात प्रत्यक्षात हेराफेरी होते, याची आता संपूर्ण जगाला खात्री पटली आहे. याचा सर्वाधिक फटका आम्हालाच बसला आहे."

आझम खान म्हणाले की, घटनात्मक संस्थांनी स्वतःचा आदर केला पाहिजे. ईडी, आयकर विभाग, विकास प्राधिकरण आणि सीबीआयमुळे लोक खूप दुःखी आणि अस्वस्थ आहेत. माझ्यासारख्या माणसाकडे या घराव्यतिरिक्त दुसरी कोणतीही मालमत्ता नाही, त्यामुळे त्याचे स्वतःचे घर नाही. मी ५० वर्षे लखनौच्या राजकारणात सक्रिय आहे, दहा वेळा आमदार आणि दोन वेळा खासदार म्हणून काम केले आहे, पण माझ्या मालकीची १०x१० ची खोलीसुद्धा नाही. आयकर विभागाने केवढा मोठा हिशोब केला आहे.

आझम खान यांनी पुढे बोलताना सध्याच्या राजकीय परिस्थितीवरही नाराजी व्यक्त केली. त्यांच्या मते, देशातील लोकशाही व्यवस्था आणि घटनात्मक संस्थांची विश्वासार्हता टिकवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. निवडणूक प्रक्रियेवर जनतेचा विश्वास राहिला नाही, तर लोकशाहीसमोर मोठे संकट निर्माण होऊ शकते. सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनाही समान संधी मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी अप्रत्यक्षपणे अधोरेखित केले. सरकारी यंत्रणांचा वापर राजकीय दबाव निर्माण करण्यासाठी केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. ईडी, आयकर विभाग आणि सीबीआय यांसारख्या संस्थांनी निष्पक्षपणे काम करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राजकारणात दीर्घकाळ काम करूनही स्वतःकडे मोठी संपत्ती नसल्याचे सांगत त्यांनी आपल्या परिस्थितीचा उल्लेख केला. आपल्या राजकीय प्रवासात अनेक चढ-उतार पाहिले असून, त्याचा परिणाम वैयक्तिक आणि राजकीय आयुष्यावर झाल्याचे त्यांनी सूचित केले.

लोकांना मतदानापासून रोखण्यासाठी रस्ते अडवले

आझम खान म्हणाले,"रामपूरमध्ये निवडणुकीतील गैरव्यवहाराची पहिली घटना घडली, तेव्हा पोलीस अधिकाऱ्यांनी शस्त्रे दाखवून मतदारांना पळवून लावले आणि घराबाहेर गुंड तैनात केले होते, तर दुसरीकडे पोलीस व पीएसीच्या जवानांनी लोकांना मतदानापासून रोखण्यासाठी रस्ते अडवले होते. त्यावेळी जर इंडिया ब्लॉकने हे प्रकरण गांभीर्याने घेतले असते, तर कुंदरकी, संभल, हरयाणा किंवा बंगालमध्ये लागलेले निकाल कदाचित दिसले नसते. मी अनेक कायदेशीर खटल्यांमध्ये अडकलो असल्याने कदाचित त्यांनी याकडे गांभीर्याने पाहिले नसावे."

ट्रम्प-पुतिन-जिनपिंग, जगाचं लक्ष लागलेल्या महाबैठकीत काय ठरलं?

महाईन्यूज । शेनझेन

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांच्यात आज चीनमधील शेनझेन येथे झालेल्या बैठकीकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलं होतं. दरम्यान, या बैठकीमध्ये इराण युद्ध, रशिया-युक्रेन युद्ध यांसह अण्वस्त्रांचा प्रसार आणि संयुक्त राष्ट्रांमधील सुधारणांपर्यंत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. दरम्यान, या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांबाबत संयुक्त निवेदनामधून माहिती देण्यात आली आहे.



ट्रम्प, पुतिन आणि जिनपिंग यांच्यात झालेली ही बैठक सुमारे तासभर चालली. सध्याच्या जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वपूर्ण मानली जात होती. दरम्यान, ही पहिली त्रिपक्षीय बैठक म्हणजे एक ऐतिहासिक क्षण असल्याचे सांगितले. तसेच अमेरिका, रशिया आणि चीनकडे जगातील अण्वस्त्रांची संख्या कमी करण्यासह त्यांच्या वापराचा धोका कमी करण्याबाबत चर्चा करण्याची क्षमता आहे असे सांगितले. तर चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांनीही ट्रम्प यांच्या सुरात सूर मिसळून अण्वस्त्रांवर निर्बंध आणण्याचा आणि त्यांना संपूर्णपणे नष्ट करण्याचा विचार मांडला. तसेच संपूर्ण जगाला अण्वस्त्रांपासून मुक्त करण्याच्या गरजेवरही त्यांनी जोर दिला. तर रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन यांनी दुसऱ्या महायुद्धाचा उल्लेख करत अमेरिका, रशिया आणि चीन हे त्या युद्धातील विजेते होते. त्यामुळे आताही जागतिक पातळीवर शांतता कायम ठेवणे ही त्यांची संयुक्त जबाबदारी आहे, असे सांगितले. दरम्यान, अमेरिका, रशिया आणि चीनच्या राष्ट्रप्रमुखांमध्ये झालेल्या बैठकीनंतर तिन्ही देशांकडून संयुक्त निवेदन प्रसिद्ध करण्यात आलं. त्यात खालील महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

जागतिक आव्हानांचा अधिक प्रभावीपणे सामना करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेच्या आपल्या मूळ उद्देशाची पूर्तता करता यावी यासाठी अमेरिका, रशिया आणि चीन मिळून संयुक्त राष्ट्रांमध्ये सुधारणांच्या दिशेने काम करतील. अमेरिका, रशिया आणि चीन हे तिन्ही देश मिळून रिफाईंड पेट्रोलियम उत्पादनांचं उत्पादन आणि पुरवठा वाढवण्यासाठी योजना आखतील. तसेच जगातील सर्व देशांच्या हितामध्ये उर्जेचा स्थिर पुरवठा वाढवण्याच्या महत्त्वावरही तिन्ही देशानी सहमती दर्शवली. यावेळी आंतरराष्ट्रीय क्रिमिनल कोर्ट आणि अशा इतर संस्थांनी आपल्या अधिकार क्षेत्राचा चुकीचा वापर करू नये, यावर तिन्ही देशांच्या नेत्यांनी सहमती दर्शवली.

सत्तासमीकरणांमध्ये नव्या पर्वाची सुरुवात?

या बैठकीमुळे जागतिक राजकारणात अमेरिका, रशिया आणि चीन यांच्यातील संबंधांना नवी दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या काही वर्षांपासून या तीनही महासत्तांमध्ये विविध मुद्द्यांवरून तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. युक्रेन युद्ध, तैवानचा प्रश्न, मध्यपूर्वेतील संघर्ष आणि जागतिक व्यापारातील स्पर्धा अशा अनेक मुद्द्यांवरून या देशांचे मतभेद कायम आहेत. मात्र, अण्वस्त्र नियंत्रण आणि जागतिक शांततेच्या मुद्द्यावर तिन्ही देशांनी एकत्र येण्याची तयारी दर्शवणे महत्त्वपूर्ण मानले जात आहे.



आलियाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर डंका

बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्ट हिने पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली आहे. प्रतिष्ठित 'टाइम' मासिकाच्या 'TIME 100 Next India' या विशेष यादीच्या मुखपृष्ठावर आलिया भट्टला स्थान मिळाले आहे. तिच्या या यशामुळे चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, मनोरंजनविश्वातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. TIME 100 Next India'च्या मुखपृष्ठावर आलिया भट्ट झळकल्याने तिच्या नावाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या विशेष यादीत अभिनेता वेदांग रैना, पार्वती थिरुवोथू, आर्यन खान, फहीम अब्दुल्ला, संगीतकार अनिरुद्ध रविचंद्रन, क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी आणि कनी कुसरुती यांसारख्या विविध क्षेत्रांतील प्रतिभावंतांचाही समावेश आहे. आलिया भट्टला मिळालेली ही आंतरराष्ट्रीय ओळख तिच्या अभिनय कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे. तिच्या अभिनयासोबतच भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाची जागतिक स्तरावर दखल घेतली जात असल्याने चाहत्यांकडून तिचे अभिनंदन केले जात आहे. सोशल मीडियावरही तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



सिद्धार्थ-कियाराच्या लेकीचा व्हिडिओ व्हायरल

अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा आणि अभिनेत्री कियारा अडवाणी दुसऱ्यांदा आई-बाबा होणार आहेत. सोशल मीडिया पोस्टद्वारे ही आनंदाची बातमी त्यांनी चाहत्यांसोबत शेअर केली होती. मात्र अद्यापही दोघांनी त्यांची पहिली मुलगी सरायाह हिचा चेहरा दाखवलेला नाही. सिद्धार्थ आणि कियारा यांनी आपल्या मुलीला आतापर्यंत प्रसिद्धीच्या झगमगाटापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. तिचे फोटो किंवा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करतानाही त्यांनी तिचा चेहरा दिसणार नाही याची काळजी घेतली आहे. मात्र अलिकडेच सिद्धार्थ-कियाराचा लेकीसोबतचा एक व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. यात तिचा चेहरा दिसत असून कियारा झाकण्याचा प्रयत्न करते. यानंतर आता सिद्धार्थ आणि कियारा यांनी मीडिया, पापाराझींना महत्त्वाचे आवाहन केले आहे. सरायाहचा हा व्हिडीओ पुढे शेअर करू नये. तसेच, कोणाला हा व्हिडीओ शेअर करायचाच असल्यास त्यामध्ये मुलीचा चेहरा इमोजी किंवा ब्लरच्या मदतीने झाकावा, असे त्यांनी सांगितले आहे. आपल्या मुलीची ओळख आणि खासगी आयुष्य जपण्याचा या जोडप्याचा प्रयत्न आहे. आपल्या मुलीच्या खासगी आयुष्याचा आदर करावा, हीच त्यांची अपेक्षा आहे.



टायगर श्रॉफचे कमबॅक; नवीन गाणं रिलीज

बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफने गोळीबारच्या घटनेनंतर कमबॅक केले आहे. त्याचं नवीन गाणं रिलीज झाले आहे. 'तेनु लेके जाना' असं या गाण्याचं नाव आहे. टायगर श्रॉफने हे गाणे री आलिया आणि श्रेया जैन यांच्यासोबत मिळून गायले आहे. द रिशने या गाण्याचे बोल लिहिले असून या गाण्याची निर्मातीही तिनेच केली आहे. टायगर श्रॉफने आपल्या नवीन गाण्याचा टीझर शेअर करताना कॅप्शनमध्ये लिहिले, 'एक और चांस, एक और डांस.' अभिनेत्याच्या या संदेशाला त्याचे पुनरागमन मानले जात आहे. व्हिडिओमध्ये तो काळ्या रंगाचा ड्रेस घातलेला दिसतो. त्याचे दमदार डान्स मूव्ह्ज आणि बॉडी या टीझरचे खास आकर्षण ठरत आहे. या गाण्यात टायगर अभिनेत्री केतिका शर्मासोबत रोमान्स करताना दिसत आहे. हे गाणं २००९ मध्ये आलेल्या 'जय वीरू' चित्रपटातील 'तेनु ले' या गाण्याचे रिक्रिएटेड व्हर्जन आहे. मूळ गाण्याला ओमर इनायत यांनी आपला आवाज दिला होता. त्यात कुणाल खेमू आणि अंजना सुखानी दिसले होते. आता नवीन व्हर्जनमध्ये टायगर आणि केतिका शर्मा यांची जोडी प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसेल. टायगर पुन्हा एकदा आपल्या जुन्या अंदाजात परतला आहे. मुंबईत झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर सुमारे एका महिन्याने अभिनेत्याने सोशल मीडियावर पुनरागमन केले आहे. सोमवारी त्याने आपल्या आगामी 'तेनु लेके जाना' या गाण्याचा टीझर इन्स्टाग्रामवर शेअर केला होता. १८ ऑक्टोबर रोजी झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतरची ही त्याची पहिलीच सोशल मीडिया पोस्ट होता. टायगरच्या पुनरागमनामुळे त्याचे चाहतेही आनंद व्यक्त करत आहे. गोळीबाराच्या घटनेनंतर टायगर श्रॉफच्या या कमबॅकमुळे त्याच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली असून, 'तेनु लेके जाना' या गाण्याला प्रेक्षकांचा कसा प्रतिसाद मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



चहलची ऐतिहासिक कामगिरी

टी-२० क्रिकेटमध्ये ४०० बळी घेणारा ठरला पहिला भारतीय गोलंदाज

महाईन्यूज । नवी दिल्ली

भारताचा उत्कृष्ट लेग-स्पिनर युझवेंद्र चहलने क्रिकेटच्या जगात एक नवा टप्पा गाठला आहे. भारतीय क्रिकेट संघापासून दूर असलेला युझवेंद्र चहल सध्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये हरियाणाचे प्रतिनिधित्व करत आहे. चहलने हरियाणाविरूद्ध तमिळनाडू या सामन्यात प्रभावी गोलंदाजी करत ३ बळी मिळवले. या कामगिरीसह, त्याने टी-२० क्रिकेटमध्ये अशी कामगिरी केली आहे, जी आजवर कोणत्यात भारतीय खेळाडूला जमलेली नाही.

युझवेंद्र चहल हा टी-२० क्रिकेटमध्ये ४०० बळी घेणारा पहिला भारतीय गोलंदाज ठरला आहे. त्याच्यानंतर या यादीत दुसऱ्या क्रमांकावर भुवनेश्वर कुमार आहे, ज्याने ३६६ विकेट्स घेतल्या आहेत. तर तिसऱ्या क्रमांकावर जसप्रीत बुमराह असून त्याच्या नावे ३५४ विकेट्स आहेत. याशिवाय चौथ्या पाचव्या स्थानी भारताचे पियूष चावला व आर अश्विन हे फिरकीपटू आहेत.

तामिळनाडूविरुद्धच्या अलीकडील सामन्यात युझवेंद्र चहलने अत्यंत किफायती गोलंदाजी केली. त्याने आपल्या ४ षटकांत केवळ १६ धावा दिल्या आणि ३ महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. या कामगिरीसह, त्याच्या टी-२० कारकिर्दीतील एकूण विकेट्सची संख्या ४०२ वर पोहोचली आहे. जरी चहल २०२३ (वेस्ट इंडिज दौऱ्या) पासून भारतीय टी-२० संघातून बाहेर असला, तरी तो आयपीएल आणि देशांतर्गत स्पर्धांमध्ये सातत्याने चमकदार कामगिरी करत आहे. तर काऊंटी क्रिकेटमध्येही युझवेंद्र चहलने लाल चेंडूने चांगली कामगिरी केली होती.

चहल आणि निशांत सिंधू (प्रत्येकी ३ बळी) यांच्या भेदक गोलंदाजीसमोर सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत तमिळनाडूचा संपूर्ण संघ २० षटकंही टिकू शकला नाही आणि अवघ्या १२४ धावांत कोसळला. प्रत्युत्तरात, हरियाणा संघाने १६.१ षटकांत ३ गडी गमावून हे लक्ष्य गाठले. ३ बळी घेण्याबरोबरच, निशांत सिंधूने फलंदाजीतही चमक दाखवली. त्याने ५ चौकारांच्या मदतीने नाबाद ३७ धावा केल्या. या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीसाठी निशांतला 'प्लेअर ऑफ द मॅच' म्हणून घोषित करण्यात आलं.



T20 क्रिकेटमध्ये भारतासाठी सर्वाधिक बळी घेणारे गोलंदाज

- ४०२ विकेट्स – युझवेंद्र चहल
- ३६६ विकेट्स – भुवनेश्वर कुमार
- ३५४ विकेट्स – जसप्रीत बुमराह
- ३२९ विकेट्स – पियुष चावला
- ३२३ विकेट्स – आर. अश्विन
- ३०० विकेट्स – अक्षर पटेल
- २९४ विकेट्स – अर्शदीप सिंग

दक्षिण आफ्रिकेचा बांगलादेशावर एकतर्फी विजय; WTC मध्ये अव्वल स्थान!

महाईन्यूज । दक्षिण आफ्रिका

बांगलादेशचा संघ सध्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना जोहान्सबर्गच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने एकतर्फी खेळ करत ९ गडी राखून दमदार विजयाची नोंद केली. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने २ कसोटी सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. यासह वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेच्या गुणतालिकेत दक्षिण आफ्रिकेचा संघ अव्वल स्थानी पोहोचला आहे.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या बांगलादेशने ४०० धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेने ५५७ धावांची डोंगर उभारून पहिल्या डावात मोठी आघाडी घेतली. त्यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या बांगलादेशचा डाव अवघ्या १६८ धावांवर आटोपला. यासह दक्षिण आफ्रिकेला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १२ धावांची गरज होती. हे आव्हान दक्षिण आफ्रिकेने ९ गडी राखून पूर्ण केलं.



बांगलादेशला पराभूत करताच गतविजेता दक्षिण आफ्रिकेचा संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे. दक्षिण आफ्रिकेने आतापर्यंत एकूण १२ गुणांची कमाई केली आहे. तर विजयाची सरासरी ७५ टक्के इतकी झाली आहे. यासह दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडला मागे टाकलं आहे. न्यूझीलंडचा संघ या यादीत दुसऱ्या स्थानी आहे. न्यूझीलंडने आतापर्यंत ५२ गुणांची कमाई केली आहे. यासह विजयाची सरासरी ७२.२२ इतकी आहे. तर ऑस्ट्रेलियाचा संघ या यादीत तिसऱ्या स्थानी आहे. ऑस्ट्रेलियाने आतापर्यंत १०८ गुणांची कमाई केली असून विजयाची सरासरी ६९.२३ इतकी आहे. तसेच भारतीय संघ या यादीत चौथ्या स्थानी आहे. भारतीय संघाने आतापर्यंत ६८ गुणांची कमाई केली असून विजयाची सरासरी ५१.५२ इतकी आहे.

दुसऱ्या डावात बांगलादेशचा फ्लॉप शो!

पहिल्या डावात ४०० धावांचा पल्ला गाठणाऱ्या बांगलादेशला दुसऱ्या डावात हवी तशी कामगिरी करता आली नाही. संपूर्ण संग १६८ धावांवर गारद झाला. दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी या डावात चांगली गोलंदाजी केली. फिरकी गोलंदाज सायमन हार्मरने या डावात सर्वाधिक ६ गडी बाद केले. तर कगिसो रबाडाने ३ गडी बाद केले. बांगलादेशकडून फलंदाजी करताना लिटन दासने सर्वाधिक ३९ धावांची खेळी केली. तर महफिजुल इस्लामने ३२ धावांची खेळी केली.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शुक्रवार ।
दि. 20 नोव्हेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

पिंपरी-चिंचवडमधील विकासकामांना २० कोटीचे आर्थिक बळ!

मोशीतील उद्यान, स्पर्धा परीक्षा अभ्यासिका, अंतर्गत रस्ते आणि व्यायामशाळांसाठी निधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा निर्णय

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

भोसरी विधानसभा मतदारसंघातील मोशी, चऱ्होली, जाधववाडी, दिघी, डुडुळगाव, चिखली आणि भोसरी परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकासाला आर्थिक बळ मिळणार आहे. विविध विकासकामांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपा महायुती सरकारने तब्बल २० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. नगरविकास विभागाने दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला असून, एकूण १०२ विकासकामांचा यामध्ये समावेश आहे.



पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक सुविधा, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पायाभूत सुविधा, अंतर्गत रस्ते आणि व्यायामशाळांच्या उभारणीसाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये मोशी येथील उद्यान विकसित करण्यासाठी पाच कोटी रुपये, तर बोऱ्हाडेवस्ती, मोशी येथे एमपीएससी आणि यूपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभारण्याकरिता पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

विशेष म्हणजे, जाधववाडी आणि चऱ्होली परिसरातील विविध अंतर्गत रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठीही मोठ्या प्रमाणात कामांना मंजुरी देण्यात आली आहे. जाधववाडीतील पंतनगर, वणवेचाळ परिसर तसेच चऱ्होलीतील किवळे मळा, सृष्टी पार्क, मोरयानगर, काळजेवाडी, श्रीराम कॉलनी आणि गंधर्व पार्क परिसरातील रस्त्यांचा यामध्ये समावेश आहे. या कामांमुळे संबंधित भागांतील नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीसाठी अधिक चांगल्या सुविधा निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

याशिवाय मोशी, दिघी, चऱ्होलीतील दाभाडेवस्ती, डुडुळगाव, चिखली, भोसरी आणि जाधववाडी येथे प्रत्येकी एक अशा सात व्यायामशाळांच्या उभारणीसाठीही निधी मंजूर करण्यात आला आहे. स्थानिक युवकांना व्यायामाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही कामे महत्त्वाची ठरणार आहेत.

भोसरी विधानसभा मतदारसंघातील विकासकामांसाठी २० कोटी रुपयांच्या निधीला मिळालेली मंजुरी ही परिसरातील पायाभूत सुविधांच्या विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण घडामोड मानली जात आहे. विशेषतः मोठ्या प्रकल्पांबरोबरच नागरी वस्त्यांमधील अंतर्गत रस्ते, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका आणि युवकांसाठी व्यायामशाळा अशा स्थानिक गरजांवरही या निधीतून भर देण्यात आला आहे.

या कामांची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार असून, प्रकल्प खर्चाचा संपूर्ण हिस्सा राज्य शासनाचा राहणार आहे. संबंधित कामांना आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय मान्यता आणि ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. निधी वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे टप्प्याटप्प्याने जारी करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

भोसरी मतदारसंघात १०२ विकासकामे

भोसरी विधानसभा मतदारसंघातील मोशी, चऱ्होली, जाधववाडी, दिघी, डुडुळगाव, चिखली आणि भोसरी परिसरातील १०२ विकासकामांसाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मोशीतील उद्यान आणि बोऱ्हाडेवस्तीतील एमपीएससी-यूपीएससी अभ्यासिकेसाठी प्रत्येकी पाच कोटी रुपये देण्यात येणार आहेत. तसेच सात ठिकाणी व्यायामशाळा उभारणे आणि विविध अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे.

> “पिंपरी-चिंचवडचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास हाच आमचा संकल्प आहे. वाढत्या नागरीकरणाचा विचार करून नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी आणि युवकांना क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. मतदारसंघातील १०२ विकासकामांसाठी तब्बल २० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळणे ही निश्चितच समाधानाची बाब आहे. मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपा महायुती सरकारने शहराच्या विकासासाठी दिलेल्या या आर्थिक बळाबद्दल मनःपूर्वक आभार! मंजूर विकासकामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी आमचा पाठपुरावा कायम राहील. पिंपरी-चिंचवडकरांचा विश्वास हीच आमची ताकद आणि शहराचा शाश्वत विकास हेच आमचे ध्येय आहे!”
>
> **- महेश लांडगे,**
> **भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

लोहकरवाडीतील गरजू कुटुंबांसाठी नगरसेविका अर्चना करांडे यांचा पुढाकार!

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त 'एक हात मदतीचा' उपक्रम

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

जुन्नर तालुक्यातील लोहकरवाडी येथील गरजू कुटुंबांना मदत पोहोचवण्यासाठी प्रभाग क्रमांक १३ च्या नगरसेविका सौ. अर्चना अक्षय करांडे यांनी पुढाकार घेतला आहे. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा पिंपरी-चिंचवडच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमांतर्गत त्यांनी लोहकरवाडीसाठी सहभाग घेतला आहे.



वाढदिवसानिमित्त हार-तुरे, पुष्पगुच्छ आणि होर्डिंग्जवर होणारा खर्च गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी वळवावा, असे आवाहन या उपक्रमातून करण्यात आले आहे. पुणे जिल्ह्यातील ५१ आदिवासी गावांमधील गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचवण्याचे उद्दिष्ट आयोजकांनी ठेवले आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातील लोकप्रतिनिधींनाही ग्रामीण भागातील कुटुंबांच्या मदतीसाठी सहभागी करून घेण्यात आले आहे.

या जिल्हास्तरीय उपक्रमात प्रभाग क्रमांक १३ मधून सहभागी होत करांडे यांनी जुन्नर तालुक्यातील लोहकरवाडीवर लक्ष केंद्रित केले आहे. लोहकरवाडीतील गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचवण्यावर त्यांच्या सहभागाचा भर आहे.

> आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमात सहभागी होताना आम्ही जुन्नर तालुक्यातील लोहकरवाडीची निवड केली. गावातील गरजू कुटुंबांच्या गरजा समजून घेऊन त्यांच्यापर्यंत मदत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. लोकप्रतिनिधी म्हणून गरजेच्या वेळी कुटुंबांच्या पाठीशी उभे राहणे, ही आमची जबाबदारी आहे.
>
> **- अर्चना करांडे, नगरसेविका तथा अध्यक्षा, अ-प्रभाग, पिंपरी-चिंचवड.**

भाजपा नगरसेवक प्रा. उत्तम केंदळे यांच्या पाठपुराव्याला यश!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

निगडी-यमुनानगर येथील प्रभाग क्रमांक १३ मधील महत्त्वाच्या नागरी सुविधांच्या विकासासाठी नगरसेवक प्रा. उत्तम प्रकाश केंदळे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण मागणी आणि पाठपुराव्याला यश मिळाले असून त्यांच्या प्रयत्नांतून निगडी परिसरातील तीन महत्त्वाच्या विकासकामांसाठी स्थायी समितीने सल्लागार नियुक्तीच्या प्रक्रियेला मंजुरी(दि.१८) दिली आहे.





यामध्ये अंकुश चौक ते त्रिवेणीनगर चौक (स्पाईन रस्ता) येथील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी ग्रेडसेपरेटर अथवा उड्डाणपूल उभारणे, निगडी स्मशानभूमीचा दुसरा टप्पा विकसित करणे आणि यमुनानगर येथील अमृतानंदमयी मठाकडे जाणाऱ्या रस्त्याची व इतर मुख्य रस्त्याची सुधारणा करणे या कामांचा समावेश आहे. आमदार महेशदादा लांडगे यांच्या सहकार्यामुळेच विकास कामांना चालना मिळत आहे.तसेच नगरसेविका अर्चनाताई करांडे आणि नगरसेवक बापू घोलप यांच्या सहकार्याने या विकासकामांसाठी केंदळे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

अंकुश चौक ते त्रिवेणीनगर चौक या स्पाईन रस्त्यावर वारंवार होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन या मार्गावर ग्रेडसेपरेटर अथवा उड्डाणपूल उभारण्याची मागणी केंदळे यांच्याकडून करण्यात आली होती. यासाठी १५ जून २०१९ रोजी मागणीपत्र देण्यात आले होते. त्यानंतर १९ ऑगस्ट २०१९ रोजी महापालिकेकडून पत्रव्यवहार झाला. या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करत १६ फेब्रुवारी २०२६ रोजी स्मरणपत्र देण्यात आले. अखेर या कामासाठी सल्लागार नियुक्तीला महापालिकेने मंजुरी दिल्याने वाहतूक समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

निगडी यमुनानगर येथील अमृतानंदमयी मठाकडे जाणाऱ्या रस्त्याची व प्रभागातील इतर मुख्य रस्त्याची सुधारणा करण्याची मागणीही प्रा. उत्तम केंदळे यांनी प्रशासकीय कालावधीपासून सातत्याने लावून धरली होती. या कामासाठी त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. आमदार महेशदादा लांडगे यांच्या माध्यमातून तसेच नगरसेविका अर्चनाताई करांडे आणि नगरसेवक बापू घोलप यांच्या सहकार्याने या प्रकल्पाच्या कामासाठी सल्लागार नियुक्तीला मंजुरी मिळाली आहे. या तिन्ही कामांसाठी मागणीपत्रे, स्मरणपत्रे आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करत प्रा. उत्तम केंदळे यांनी नागरी सुविधांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. सल्लागार नियुक्तीला मिळालेली मंजुरी ही विकासकामांच्या दिशेने महत्त्वाची प्रशासकीय प्रक्रिया असली, तरी प्रत्यक्ष कामांना सुरुवात होऊन ती वेळेत पूर्ण होणे अपेक्षित आहे असे मत नगरसेवक प्रा उत्तम केंदळे यांनी व्यक्त केले.

निगडी स्मशानभूमीच्या दुसऱ्या टप्प्याच्या विकासाला चालना

निगडी स्मशानभूमीच्या विकासासाठी पहिल्या टप्प्यात २०१७ ते २०२२ या कालावधीत विविध कामे पूर्ण करण्यात आली. यामध्ये नवीन विद्युत दाहिनी, हवा प्रदूषण नियंत्रण युनिट, दुसरी विद्युत दाहिनी तसेच गॅस व विद्युत दाहिनी युनिट अशा सुविधांचा समावेश आहे. मात्र, वाढत्या गरजा लक्षात घेता स्मशानभूमीच्या दुसऱ्या टप्प्यातील विकासकामांची आवश्यकता होती.यासाठी २४ नोव्हेंबर २०२२ रोजी मागणीपत्र देण्यात आले होते. त्यानंतर १६ फेब्रुवारी २०२६ रोजी स्मरणपत्र देऊन पाठपुरावा करण्यात आला. या कामासाठी महापालिकेचा ठराव आणि तरतूद वर्गीकरणाची प्रक्रिया २७ जुलै २०२६ रोजी झाल्याची माहिती देण्यात आली आहे. आता दुसऱ्या टप्प्यातील विकासकामांसाठी सल्लागार नियुक्तीला मंजुरी मिळाल्याने या प्रकल्पाला गती मिळण्याची अपेक्षा केंदळे यांनी व्यक्त केली.

> आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पाईन रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर उपाय, निगडी स्मशानभूमीचा दुसरा टप्पा आणि यमुनानगरसह प्रभागातील मुख्य रस्त्यांची सुधारणा या तीन कामांसाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. या प्रयत्नांना नगरसेविका अर्चना करांडे आणि नगरसेवक बापू घोलप यांचे सहकार्य लाभले. सल्लागार नियुक्तीला मिळालेली मंजुरी हा महत्त्वाचा टप्पा आहे. आता आराखडे लवकर तयार व्हावेत, प्रत्यक्ष कामांना सुरुवात व्हावी आणि ती वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी आमचा पाठपुरावा सुरू राहील.
>
> **– प्रा. उत्तम केंदळे, नगरसेवक, भाजपा.**

१० जानेवारी २०२७ रोजी 'पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉन'चे आयोजन

औद्योगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडची आता जागतिक क्रीडा नकाशावरही छाप

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

औद्योगिक नगरी म्हणून देशभरात ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराला आता क्रीडा क्षेत्रातही जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने येत्या १० जानेवारी २०२७ रोजी 'पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉन'चे आयोजन करण्यात येणार आहे. या मॅरेथॉनमध्ये ४२ किलोमीटर फुल मॅरेथॉन, २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉन, १० किलोमीटर आणि ५ किलोमीटर अशा विविध गटांचा समावेश असणार आहे. नागरिकांमध्ये आरोग्य आणि फिटनेसविषयी जागरूकता निर्माण करण्यासोबतच स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय धावपटूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



मॅरेथॉनचा मार्ग :

डी. वाय. पाटील मैदान – धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक – भक्ती-शक्ती चौक – छत्रपती शिवाजी महाराज चौक – टेल्को रोड – इंद्रायणीनगर – एम्पायर इस्टेट ब्रिज – काळेवाडी चौक – डांगे चौक – संत तुकाराम ब्रिज – रावेत – कॅन्टोन्मेंट – डी. वाय. पाटील मैदान.

मॅरेथॉनच्या आयोजनासाठी अशा स्पर्धांचा अनुभव असलेल्या संस्थेची मदत घेतली जाणार असून, स्पर्धेची नोंदणी आणि अन्य व्यवस्थापन आंतरराष्ट्रीय मानकांनुसार करण्यात येणार आहे. तसेच 'पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉन'चा समावेश जागतिक मॅरेथॉन कॅलेंडरमध्ये व्हावा, यासाठीही विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

महापौर रवि लांडगे म्हणाले, "पिंपरी-चिंचवड शहराची ओळख आजवर औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीमुळे देशभरात निर्माण झाली आहे. आता क्रीडा क्षेत्रातही शहराला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉनच्या माध्यमातून शहरातील तरुणाई आणि नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीची प्रेरणा मिळेल. देश-विदेशातील धावपटूंना आकर्षित करणारी ही स्पर्धा शहराच्या लौकिकात भर घालणारी ठरेल. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा."

"पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉनचे आयोजन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियोजनानुसार करण्यात येणार आहे. ४२, २१, १० आणि ५ किलोमीटर अशा विविध गटांमुळे सर्व वयोगटांतील धावपटूंना सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेचा जागतिक मॅरेथॉन कॅलेंडरमध्ये समावेश व्हावा, यासाठी आवश्यक प्रयत्न केले जातील. शहरात क्रीडा संस्कृती रुजविणे, नागरिकांचे आरोग्य उत्तम राखणे आणि पिंपरी-चिंचवडला आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात ओळख मिळवून देणे हा या आयोजनामागील मुख्य उद्देश आहे." असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले.

या कार्यक्रमाचे अनुषंगाने महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांची पत्रकार परिषद आज घेण्यात आली होती,या परिषदेस उपमहापौर शर्मिला बाबर,विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर,शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे,क्रीडा समिती सभापती कैलास कुटे,क्रिडा समिती सदस्य योगेश लांडगे,धर्मपाल तंतरपाळे,शाम जगताप,तानाजी बारणे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम,उप आयुक्त अण्णा बोदडे, पंकज पाटील,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते.

मॅरेथॉनसाठी इच्छुक धावपटूंना INDIARUNNING.COM या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे.

औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केलेल्या पिंपरी-चिंचवड शहराच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला या मॅरेथॉनमुळे नवी दिशा मिळणार असल्याचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले. तर या उपक्रमाच्या माध्यमातून शहरात धावण्याची आणि क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन मिळण्यासोबतच देश-विदेशातील धावपटू, क्रीडाप्रेमी आणि पर्यटकांना शहराकडे आकर्षित करण्याची संधी निर्माण होणार असल्याचे मत अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी व्यक्त केले.

वाकड मेट्रोपर्यंत थेट बससेवा सुरू करा; नाना काटे यांची आग्रही मागणी

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

रहाटणी, पिंपळे सौदागर आणि पिंपळे गुरव येथून वाकड मेट्रो स्थानकापर्यंत थेट आणि नियमित पीएमपीएमएल बससेवा सुरू करावी, अशी आग्रही मागणी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी केली आहे. प्रस्तावित मार्गाची तातडीने पाहणी करून प्रवासी संख्येचे सर्वेक्षण करावे आणि सकाळ-संध्याकाळच्या कार्यालयीन वेळेत पुरेशा बसफेऱ्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे.



हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो सेवा सुरू झाल्याने हिंजवडी आयटी पार्कमध्ये कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध झाला आहे. मात्र, या तीन भागांतून वाकड मेट्रो स्थानक गाठण्यासाठी नियमित आणि थेट बससेवा नसल्याने प्रवाशांना दुचाकी, खासगी वाहने किंवा इतर वाहतूक पर्यायांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे कार्यालयीन वेळेत रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण वाढतो आणि प्रवाशांचा वेळ व खर्चही वाढतो, याकडे काटे यांनी लक्ष वेधले.

रहाटणी, पिंपळे सौदागर आणि पिंपळे गुरव परिसरातून दररोज मोठ्या संख्येने आयटी कर्मचारी हिंजवडीला ये-जा करतात. त्यात महिला कर्मचाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. त्यामुळे बसचे वेळापत्रक कार्यालयीन वेळांशी जुळवून नियमित फेऱ्या दिल्यास मेट्रोपर्यंतचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि परवडणारा होईल, अशी भूमिका काटे यांनी मांडली.

वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर या परिसराला मेट्रोशी जोडणारी बससेवा ही सार्वजनिक वाहतुकीची गरज आहे. थेट बस उपलब्ध झाल्यास खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण आणि मार्गाची पाहणी करून बससेवा सुरू करण्याबाबत लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी काटे यांनी केली आहे.

> "रहाटणी, पिंपळे सौदागर आणि पिंपळे गुरवमधील नागरिकांना वाकड मेट्रो स्थानक गाठण्यासाठी रोज खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते. या तिन्ही भागांतून स्थानकापर्यंत थेट पीएमपीएमएल बससेवा सुरू केल्यास आयटी कर्मचाऱ्यांचा वेळ आणि प्रवासखर्च वाचेल. विशेषतः महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित आणि नियमित प्रवासाचा पर्याय मिळेल. पीएमपीएमएलने तातडीने मार्गाची पाहणी आणि प्रवासी सर्वेक्षण करून सकाळ-संध्याकाळच्या कार्यालयीन वेळेत पुरेशा बसफेऱ्या सुरू कराव्यात.
>
> – विठ्ठल उर्फ नाना काटे, माजी विरोधी पक्षनेते, पिंपरी-चिंचवड महापालिका.

बोरघर कोकणेवाडीत गरजू कुटुंबांना मदतीचा हात

आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवराज लांडगे यांच्याकडून जीवनावश्यक वस्तूंचे किटवाटप

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पुणे जिल्ह्यातील बोरघर कोकणेवाडी येथील गरजू कुटुंबांना धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले. भाजपा इंद्रायणीनगर-भोसरीचे मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे यांनी गावाला भेट देऊन ही मदत कुटुंबांपर्यंत पोहोचवली. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणाऱ्या 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमांतर्गत हे वाटप करण्यात आले.



वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून ती रक्कम गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी वापरावी, या संकल्पनेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि प्रदेश महामंत्री राजेश पांडे यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला होता.

उपक्रमांतर्गत खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांतील ५१ आदिवासी गावांमधील गरजू कुटुंबांना महिनाभर पुरेल इतका किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्याचे नियोजन आहे. याच उपक्रमातून शिवराज लांडगे यांनी बोरघर कोकणेवाडीत प्रत्यक्ष जाऊन मदतीचे वाटप केले.



आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त होणारा खर्च गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी वापरावा, या विचारातून 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' हा उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमांतर्गत बोरघर कोकणेवाडीत प्रत्यक्ष जाऊन आम्ही गरजू कुटुंबांना धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंची किट दिली. या मदतीमुळे कुटुंबांच्या दैनंदिन खर्चाला काहीसा हातभार लागेल.

– शिवराज लांडगे, भाजपा इंद्रायणीनगर, भोसरी मंडलाध्यक्ष.

इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी संदीप तापकीर; स्वागताध्यक्षपदी डॉ. सुहास कांबळे!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

मोशी येथे आयोजित करण्यात येणाऱ्या पाचव्या इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ इतिहास संशोधक व साहित्यिक संदीप भानुदास तापकीर यांची, तर स्वागताध्यक्षपदी प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ तथा नवनिर्वाचित नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. इंद्रायणी साहित्य परिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या कार्यकारिणी बैठकीत इंद्रायणी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक लेखक व कवी श्री अरुण बोऱ्हाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या दोन्ही निवडींवर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यामुळे यंदाच्या साहित्य संमेलनाला ऐतिहासिक संशोधन, साहित्य आणि सामाजिक कार्याचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे.



गड-किल्ल्यांच्या इतिहासाचे अभ्यासक संदीप तापकीर

संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले संदीप भानुदास तापकीर हे महाराष्ट्राच्या इतिहासाचे अभ्यासक आणि संशोधक म्हणून परिचित आहेत. महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांवर जिल्हानिहाय आधारित त्यांची आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांनी लिहिलेल्या 'छत्रपती शिवराय' या मराठी शिवचरित्राचा हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषांमध्ये अनुवाद झाला आहे. याशिवाय शंभरहून अधिक पुस्तकांचे संपादन करण्याचे महत्त्वपूर्ण साहित्यिक कार्य त्यांनी केले आहे. इतिहास संशोधन आणि साहित्य क्षेत्रातील त्यांच्या योगदानामुळे त्यांच्या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

सामाजिक बांधिलकी जपणारे 'प्रोफेशनल लीडर' डॉ. सुहास कांबळे स्वागताध्यक्ष

स्वागताध्यक्षपदी निवड झालेले डॉ. सुहास कांबळे हे प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ असून मोशी येथील साईनाथ रुग्णालयाचे संचालक आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील कार्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे आणि कलेची व साहित्याची विशेष आवड असलेले संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. यंदाच्या महापालिका निवडणुकीत ते नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. वैद्यकीय सेवा, सामाजिक कार्य आणि लोकप्रतिनिधी म्हणून असलेला त्यांचा अनुभव साहित्य संमेलनाच्या आयोजनाला निश्चितच नवी ऊर्जा देणारा ठरणार आहे.

इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या पाचव्या पर्वाकडे आता साहित्यप्रेमींचे लक्ष लागले आहे.

इंद्रायणी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक लेखक व कवी श्री अरुण बोऱ्हाडे यांच्या उपस्थितीत परिषदेचे कार्याध्यक्ष सोपान खुडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. यावेळी डॉ. सीमा काळभोर, डॉ. पौर्णिमा कोल्हे, दामोदर वहिले, योगेश कोंढाळकर, श्रीहरी तापकीर, माणिक सस्ते, काळुराम सस्ते, संगीता थोरात, सुनील जाधव, तेजस्विनी देशमुख, संतोष सस्ते, अशोक ढोकले, महिपती साठे, अलंकार हिंगे, गोविंद आल्हाट आदी सदस्य उपस्थित होते.

यंदाचे पाचवे इंद्रायणी साहित्य संमेलन २० डिसेंबर रोजी मोशी येथील जयगणेश सभागृहात पार पडणार आहे. या संमेलनात नामवंत साहित्यिक, विचारवंत, अभ्यासक आणि मान्यवरांची मांदियाळी रसिकांना अनुभवता येणार असून, साहित्यप्रेमींसाठी हा वैचारिक आणि सांस्कृतिक मेळावा ठरणार आहे.

दरम्यान, इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने नवनिर्वाचित स्वागताध्यक्ष डॉ. सुहास कांबळे आणि संमेलनाध्यक्ष संदीप तापकीर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी साहित्यिक श्रीकांत चौगुले, व्याख्याते प्रा. प्रदीप कदम, निलेश गावडे, गणेश साहेबराव सस्ते, संतोष गोलांडे, भानुदास तापकीर आदी मान्यवर उपस्थित होते.

साहित्य, इतिहास, संस्कृती आणि वैचारिक देवाणघेवाणीला व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या

